PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 5, ISSUE 1

# विनोदाचे तत्त्व आणि स्वरूप

**डॉ. शामराव शेंडगे**
मराठी विभाग
गोविंदराव गिते कला कनिष्ट महाविद्यालय
पानगाव ता. रेणापूर लातूर
**[महाराष्ट्र] भारत**

## 1. प्रास्ताविक :

मानवी जीवनात विनोदाला अनन्यसाधारण महत्त्व असल्याचे दिसून येते. विनोद आपणास दैनंदिन दुःखापासून दूर घेऊन जातो. आपल्या मनावरील ताणाचे विरेचन करतो. आपली क्रयशक्ती वाढवितो. 'टवाळा आवडे विनोद' या उक्तीत विनोदाचे महत्त्व दुर्लक्षित केले आहे. विनोद म्हणजे केवळ हसणे नव्हे. आपल्या हसण्याचे विविध प्रकार आहेत. कधी आपले हसणे आत्मगौरवाचे, तर कधी कुच्छेष्टेचे असते. मात्र वाङ्मयीन विनोदाला वा हास्याला तत्त्वज्ञानाचा भक्कम आधार असतो.

## 2. उद्दिष्टे :

1. विनोदाचे प्रकार समजून घेणे.
2. विनोदनिर्मितीची कारणे समजून घेणे.
3. 'कोटी' व 'उपहास' या विनोदप्रकारांचे स्वरूप स्पष्ट करणे.

### 3. विनोदाचे तत्त्वज्ञान :

विनोद हा तत्त्वसूचक असतो. वाङ्मयीन विनोदनिर्मिती ही सहेतुक असते. विनोदाच्या माध्यमातून एखादे तत्त्व सूचकपणे प्रतिपादले असते. हा विनोद उच्च संस्कृतीचा निदर्शक असतो. विनोद म्हणजे टवाळकी नव्हे. निंदा-नालस्ती नव्हे. विनोदवीर हा लौकिक जीवनातील विसंगतीने दु:खी झालेला असतो. तो अंतर्मनात या विसंगती पाहून रडतो, परंतु आपणास त्या विसंगतीची जाणीव मात्र हसवत हसवत करून देत असतो. आचार्य अत्रे यांनी विनोदी माणसांची एक सुंदर ओळख करून दिली आहे. ते म्हणतात, 'जीवनातील विसंगती आणि विकृती याकडे जो दयाबुद्धीने पाहतो, तो खरा विनोदी'. विसंगतीकडे दयाबुद्धीने पाहण्याचे धारिष्टय त्याच्या साधनेचे फलित असते. विनोदी लेखकाला कोणाशी वौर पत्करण्याचे वौयक्तिक कारण नसते. येथे सर्व बाबी सामायिकरणाच्या पातळीवर पोहचविण्यात आलेल्या असतात.

एकदा आचार्य अत्रे यांच्या 'मराठा' वृत्तपत्राच्या कार्यालयाबाहेर एक गाढव मरून पडले होते. एक-दोन दिवस झाले तरी ते गाढव महानगरपालिकेच्या मुख्याधिका-यांना फोन लावला आणि गाढव मेल्याची बातमी सांगितली. याबरोबर मुख्याधिकारी खूप चिडले आणि म्हणाले, "गाढव मरून पडले हे सांगण्यासाठी तुम्ही मला कशाला फोन केला? हा फोन माझ्या हाताखालच्या माणसांना करावयाचा असतो." त्याबरोबर आचार्य अत्रे शांतपणे म्हणाले, "त्याचं काय आहे, आमच्याकडे एक रीत आहे, जो कोणी मरतो, त्यांच्या नातेवाईकांना आम्ही कळवितो, म्हणून फोन लावला." या विनोदात तर्काला हुलकावणी दिली आहे. सामान्यपणे आपल्या मेंदुला एक सुसंगत विचार करण्याची सवय लागलेली असते आणि त्यात विसंगती झाली की आपणास चटकन हसू येते. ज्याला हसता येते असा माणूस हा एकमेव प्राणी आहे. त्यामुळे विनोद ही मानवाला मिळालेली एक देणगी आहे. हा एक बुद्धीविलास आहे. "आचार्य अत्रेंच्या विनोदात वाचकांना खळखळून हसवण्याचे सामर्थ्य असल्याचे प्रदक्षिणाकार सांगतात."[1] हे निरीक्षण अनुभवगम्य आहे.

विनोदी लेखकांना वौयक्तिक जीवनाची व त्याच्या यशापयशाची काळजी नसते, मात्र त्याला समाजाची चिंता भेडसावत असते. व्हि. व्हि. गिरी भारताचे राष्ट्रपती झाले, त्यावेळी आचार्य अत्रेंनी ही बातमी मोठया खुबीने छापली. त्यांनी व्हि.व्हि. गिरींचा सात-आठ अपत्यासह फोटो छापून त्याखाली

लिहिले होते. 'व्हि. व्हि. गिरी आणि त्यांची कामगिरी' या विनोदात कामगिरी या शब्दातून व प्रतिमेतील अपत्य यांच्यात एक चमत्कारिक संगती लावली गेली आहे. ही संगती विसंगतीची प्रकर्षाने जाणीव करून देते. या विनोदाच्या मुळाशी अपत्याच्या जन्माला मोठी कामगिरी समजणे हे सूत्र आहे, त्याबरोबरच एक तत्त्वचिंतनही आहे. भारतासमोर लोकसंख्येचा प्रश्न 'आ' वासून उभा असताना महत्त्वाच्या पदांवर अशी लोकसंख्यावाढ करणारी माणसे बसणार असतील, तर हा प्रश्न कोणी सोडवायचा? या विनोदातील आचार्य अत्रे यांचे नैतिक धारिष्टय उत्तुंग आहे. सामाजिक बांधिलकीतून हे धारिष्टये अवतरत असते. आपल्यासारखी सर्वसामान्य माणसे आपल्यापेक्षा दुबळ्या माणसांवर हसतात. आपले हसणे दुबळेपणा आर्थिक, बौद्धिक व अहंकार या प्रकारांतील असते. तर श्रेष्ठ विनोदी लेखक नैतिक दुबळ्यांवर हसतो. सर्वसामान्यांच्या सहजासहजी लक्षात न आलेली ही विसंगती तो चटकन हेरतो.

## 4. विनोदनिर्मितीची कारणे :

विनोद हा तत्त्वसूचक असतो. चिरंतन चिंतनाचा हा एक व्यापार आहे. विनोदनिर्मितीची काही कारणे असल्याचे दिसून येते. 'विसंगती' हे विनोदाचे एकसमान सूत्र आहे. दोन विसंगत बाबी एकत्र आल्यानंतर विनोदनिर्मिती होते. ही विसंगती शाब्दिक, कायिक, भाषिक वा आंगिक अशा कोणत्याही प्रकारची असू शकते. या विसंगत बाबी कलात्मकरित्या एकत्र आणता येणे नितांत आवश्यक असते. त्यात एक अनौचित्य दाखवता येणे गरजेचे असते.

'अपेक्षाभंग' हे ही विनोदनिर्मितीचे महत्त्वाचे कारण आहे. फुगविलेल्या अपेक्षेच्या पदरी ज्यावेळी भोपळा पडतो, तेव्हा विनोदनिर्मिती होत असते. चर्चिल यांनी या कारणास अधिक महत्त्व दिलेले दिसून येते. आचार्य अत्रे एका सभेत म्हणाले, "या महाराष्ट्रात सर्वांत मोठा नाटककार कोण असेल, तर तो मामा वरेरकर". प्रेक्षकांनी टाळ्यांचा कडकडाट केला, नंतर अत्रे शांतपणे म्हणाले, "असे त्यांचे वौयक्तिक मत आहे." प्रेक्षकांत हशा पिकला. या विनोदनिर्मितीच्या मुळाशी अभिव्यक्तीवौशिष्टय दिसून येते. आचार्य अत्रे यांनी प्रेक्षकांस थोडा अवकाश दिला नसता, तर हशा पिकला नसता.

'अभिव्यक्तीवैशिष्टय हे विनोदनिर्मितीचे महत्त्वाचे कारण मान्य करावयास प्रत्यवाय नाही. एका महानगरपालिकेच्या सभागृहात एक सदस्य संतप्त होऊन म्हणाला, "या सभागृहात बसलेले निम्मे सदस्य मूर्ख आहेत" यावर एका सदस्याने तीव्र शब्दात आक्षेप घेतला व मुख्याधिका-यास सांगून त्याचे हे शब्द मागे घेण्यास सांगितले. त्यावर पहिला सदस्य म्हणाला, "या सभागृहातील निम्मेच सदस्य शहाणे आहेत." यामध्ये आभास निर्माण केला गेला आहे. आकलनाच्या दोन परस्पर विरोधात्म पातळ्यांचा परस्पर आघात प्रत्ययाला आणून दिला आहे.

विनोदनिर्मितीच्या कारणास प्रसंगालाही महत्त्व असते. कधी-कधी प्रसंगामुळेच विनोदनिर्मिती होते. एकदा सत्यवान सावित्री नाटक सुरू होते. या नाटकात सत्यवानाचे प्राण घेऊन जाण्यासाठी येणारा यम प्रत्यक्षातील रेड्यावर बसून येणार अशी योजना असते. सत्यवान मरण पावताच सावित्री त्याचा धावा करू लागली, वादक वादन-गायन करू लागले होते तेव्हा यमाचा रेड्यावर बसून प्रवेश झाला. रंगमंचावरील गायन-वादनांचा आवाज आणि समोरील प्रेक्षक पाहून रेडा बिथरला, तो सुसाट पळायला लागला, यम खाली पडला, सावित्री पळून गेली, वादक-गायक पसार झाले आणि मेलेला सत्यवान मेलो-मेलो म्हणून पळत सुटला.'

ब-याचदा 'मनुष्याचा स्वभाव'ही विनोदनिर्मितीला कारण ठरत असतो. सर्कशीतला विदुषक किंवा वगनाटड्याचा सोंगाड्याच त्याच्या शारीरिक हालचालीतून विनोदनिर्मिती करीत असतो. 'शारीरिक हालचाली' हेही विनोदनिर्मितीचे महत्त्वाचे कारण आहे. चार्ली चैपलिन यांचे मूक अभिनय, लॉरेल अँड हार्डी यांनी केलेली धमाल पाहून कोणीही हसल्यावाचून राहणार नाही.

## 5. विनोदाचे प्रकार :

विनोदाचे सामान्यत: शब्दनिष्ठ विनोद, प्रसंगनिष्ठ विनोद आणि कल्पनानिष्ठ विनोद असे प्रकार केले जातात. साहित्यात कोटी, उपहास, विडंबन आणि गुढोक्ती हे विनोदाचे मुख्य प्रकार आहेत.

- कोटी :

"कोटीचे शाब्दिक कोटी आणि विचार कोटी असे मुख्य प्रकार पडतात."[2] कोटी ही अल्पाक्षररमणीय असते. शाब्दिक कोटीत द्वैर्थी अर्थ दडलेला असतो आणि ऐकणाज्यास हाच अर्थ अभिप्रेत असतो. विरोधात्म कल्पना म्हणजे कोटी अशीही कोटीची व्याख्या केली जाते. दोन विरूद्ध कल्पना एकत्रित आणल्यामुळे कोटी होते. या दोन कल्पनांत उचित असेल त्याच्याविरूद्ध चित्रण केलेले असते. चि.वि. जोशी यांच्या 'भक्तकसोटी' या कथेमधील भक्तवडी या भक्तिमान गावाचे वर्णन पाहण्यासारखे आहे. "सकाळचे प्रहरी चहापानी करण्याऐवजी तेथील बायका हातात पूजापात्रे अगर परड्या घेऊन देवदर्शनाला जात व अर्थात पुरुषही देवदर्शनासच जात"3 प्रस्तुत निवेदनात जे ठासून सांगितले आहे, त्या ठासून सांगण्याच्या पद्धतीमुळेच जे सांगितले गेले आहे, त्याच्या नेमका विरूद्ध अर्थ वाचकांच्या लक्षात येतो. पुरुष हे देवदर्शनास जात नसत तर स्त्रियांना पाहण्यासाठी जात असत, हा विरूद्ध अर्थ वाचकांच्या प्रत्ययाला येतो. अश्लिल कोटीत आक्रमण प्रेरणा असते.

निरर्थकात अर्थ पाहणे म्हणजे कोटी, सदोष विचारपद्धती म्हणजे कोटी. कोटीमध्ये स्थानांतर प्रक्रिया असते. मुख्यत: कोटीचे सहेतुक कोटी आणि प्रेरणा कोटी असे प्रकार केले जातात. ज्या कोटीच्या निर्मितीमागे कोणतातरी हेतू असतो, ती सहेतूक कोटी असते. हेतू नसेल, तर ती प्रेरणा कोटी ठरते.

- उपहास :

'उपहास' हे एक शस्त्र आहे. उपहास म्हणजे खिल्ली उडविणे, टवाळकी करणे नव्हे. समाजातील विसंगती, विकृती, वाईट रुढी, परंपरा, वृत्ती व प्रवृत्ती पाहून कलावंताचे मन दुःखी होते. काय असावे आणि काय आहे, यामधील फरकाविषयी विनोदी लेखक अतिशय संवेदनशील असतो. खिल्ली उडविणे, टवाळकी करणे, हे उपहासात अंतर्भूत नसते. खरेतर विनोद हा उच्च संस्कृतीचा निदर्शक असतो. जे जे वाईट आहे, त्यावर केलेली ही एक शस्त्रक्रिया असते. या शस्त्रक्रियेने पेशंट दुखावला जात नाही, तर हसत हसत स्वतःच्या चुका सुधारण्याचा प्रयत्न करतो.

'माझी पहिली चोरी'त चोरी झाल्यानंतर पोलीसांच्या मदतीविषयी भ्रमनिरास झालेला कथानिवेदक म्हणतो, "हे त्यांचे म्हणणे खरेच होते. त्यांना जर चोरांच्या हालचालीची माहिती दिली नाही, तर त्यांनी तरी काय करावे? चोरी कशी शोधून काढावी? वास्तविक घरमालकाची आणि

पोलीसांची ही अडचण चोरानेच लक्षात घ्यायला हवी होती. त्याने आपण होऊन ही सर्व माहिती आधी म्हणा मागाहून म्हणा कळवली तर काय मोठे बिघडेल? पण नाही ना त्यांना एवढी माणुसकी असल्यावर मग काय पाहिजे होते."4 या कथानिवेदकाने येथे एक सोंग घेतले आहे. पोलीसांना उत्तरे देता-देता घरमालकाचीच तारांबळ उडते आणि आपण पोलीसांची मदत का घेतली? याचा पश्चाताप होऊ लागतो. हे सांगण्यासाठी एक मूर्ख मत खरे असल्याचे ढोंग केले आहे. येथे विसंगती हे तंत्र आहे. चोरांची माहिती पोलीसांनाच द्यावी लागत आहे.

पु.ल. देशपांडे यांच्या विनोदात सूक्ष्म निरीक्षण, प्रखर बुद्धिवाद आणि आत्मनिष्ठा याद्वारे समाजातील दोषांवर प्रहार केलेला दिसून येतो. त्यांच्या ‘बटाट्याच्या चाळी' चेच उदाहरण घ्यायचे झाले, तर ही चाळ नाना त-हेच्या व्यक्तिरेखांनी उभी राहिली आहे. या चाळीतील विकृतींनी झपाटलेल्या व्यक्ती वास्तव समाजजीवनाचा प्रत्यय देतात. पु.ल. देशपांडे यांनी विनोदाच्या दाहक व भेदक शस्त्रास्त्रांनी या व्यक्तींच्या व्यंगावर नाजूक शस्त्रक्रिया केल्याचे दिसून येते. या चाळीतील 'उपास' ही कथा त्यांच्या उपहासाचे उच्च शिखर आहे. वाढलेले वजन कमी करण्यासाठी कथानिवेदक डायटिंगचा निर्णय घेतो. बहिर्जीच्या वंशात जन्माला येऊन या चाळीत रहायला आलेली ही माणसे उपदेशाचे डोस सुरू करतात. यावर कथानिवेदक म्हणतो, "उपास सोडा, दारू सोडा, साखर सोडा, मीठ सोडा, भात सोडा असे सांगून झाले होते. फक्त बायको सोडा एवढे सांगणारा महाभाग भेटायचा राहिला होता!"[4] येथे नाहक उपदेश करण्याच्या प्रवृत्तीवर प्रहार केलेला दिसून येतो.

➤ विडंबन :

'विडंबन' हा विनोदाचा एक महत्त्वाचा प्रकार पहावयास मिळतो. 'विडंबन' हा संस्कृत शब्द असून त्याचा अर्थ अनुकरण असा होतो. 'एखाद्या विशिष्ट गद्य वा पद्य वाङ्मयकृतीचे विनोदात्मक परिणाम साधणारे अनुकरण म्हणजे विडंबन होय.' विडंबनामध्ये सामाजिक, धार्मिक, राजकीय, सांस्कृतिक आणि वाङ्मयीन लोकव्यवहारातील अनिष्ट वा अनावश्यक संकेताचे अतिशयोक्तीपूर्ण विडंबन केलेले असते. विडंबनात लोकप्रिय कलाकृतीचे, कवितेचे अनुकरण केले जाते. मूळ कवितेतील गंभीर विषय हास्यास्पद बनविला जातो किंवा सामान्य कल्पनेला गंभीर केले जाते. विडंबनात मूळ

कवितेचे विडंबन केले जात नाही. आचार्य अत्रे यांनी 'झेंडूच्या फुले'त श्रेष्ठ कवितांचे अनुकरण करीत असता या कवींची क्षमा मागितलेली दिसून येते.

एकंदरीत, विनोदाला मानवी जीवनात खूप महत्त्व दिले जाते. वाङ्मयाच्या विविध प्रकारातील विनोदाला स्थान दिलेले दिसून येते.

## संदर्भसूची :-

1. कुलकर्णी भीमराव, 'प्रदक्षिणा', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पुनर्मुद्रण 2002, पृ.398.

2. पवार गो.मा., 'विनोद : तत्त्व आणि स्वरूप', मौज प्रकाशन, पहिली आवृत्ती, 21 डिसेंबर, 2006, पृ. 53

3. जोशी चि.वि., 'भक्तकसोटी', वायफळाचा मळा, पहिली आवृत्ती, 1936, तिसरी आवृत्ती, 1957, पृ. 40

4. देशपांडे पु. ल., 'बटाट्याची चाळ', मौज प्रकाशन गृह, पहिली आवृत्ती 1958, एकोणचाळीसावी आवृत्ती, 26 जानेवारी 2013, पृ. 115.